NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

दिनांक २५.०६.२०२६ गुरुवार

(कामगिरी)

नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २४.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १८ केसेसमध्ये २१ ईसमांवर कारवाई करून २,८६,३०५/–रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसमध्ये ०१ ईसमावर कारवाई करून १,०२०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,२९५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,८६,९५०/–रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे हुडकेश्वर:– घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.

दिनांक २४.०६.२०२६ चे २२.४० वा. चे सुमारास, हुडकेश्वर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, राजापेठ बस स्टॉपजवळ, हुडकेश्वर रोड येथे एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, एक ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव संदेश उर्फ **लवंग** सुभाष पाटील, वय ३६ वर्षे, रा. प्लॉट नं. १३९, शिवाजी कॉलोनी, नासरे मंगल कार्यालयामागे, हुडकेश्वर रोड, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती ५००/– रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे सपोनि खेडीकर ९५५२३७११५५ यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे ईमामवाडा :– चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २४.०६.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, फिर्यादी अंजन योगेश पुरी, वय ५० वर्षे, रा. दलाल कम्पाऊंड, काटोल रोड, नागपूर यांचे पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत व्हि.आर. मॉल येथे एआयए. बाय तनिष्क स्टोअर्स या दुकानात एक अनोळखी ईसम वय अंदाजे ४५ वर्षे वयाचा दुकानात आला. दुकानात सेल्समन नामे दिपांशु निलकंठ शेंडे हे हजर होते, त्यांचेकडे येवून त्या ईसमाने मुलाकरीता ब्रेसलेट घ्यायचे

आहे. असे म्हटले. सेल्समन याने मुलांचे ब्रेसलेट मिळत नाही असे म्हटले तरी सुध्दा तो ईसम तेथेच काहीवेळ थांबलेला होता. सेल्समन दिपांशु हा दुकानाचे आंत पाणी पिण्याकरीता गेला असता, त्या ईसमाने दुकानाचे ड्राव्हर उघडून त्यामधील १०ग्रॅम १८२ मिलीग्रॅमची सोन्याची बांगडी किंमती ९२,६६४/—रू. ची काढून चोरून नेली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे मसपोनि. चंदापुरे ८९७५४६४११८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे वाडी :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २३.०६.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास, फिर्यादी नितेश दिलीप यादव, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. २३, मंगलधाम सोसायटी, वाडी, नागपूर हे त्यांचे सुझूकी बर्गमॅन मोपेड क्र. एम.एच ३१ एफ झेड ०२५४ ने पोलीस ठाणे वाडी हद्दीत, काटोल बायपास रोड, दिया इलेक्ट्रॉनिक्स दुकानासमोरून जात असता, एका स्विफ्ट कार चालकाने त्याचे ताब्यातील कार भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे गाडीचे डावे बाजूने धडक मारून, फिर्यादीला गंभीर जखमी केले. फिर्सादी हे जखमी अवस्थेत रोडवर बसलेले असता, कार चालकाने गाडी खाली उतरून फिर्यादीस शिवीगाळ केली व गाडीचे नुकसान केले असे म्हणून हातबुक्कीने मारपीट केली व तेथून पळुन गेला. जखमी फिर्यादीस उपचाराकरीता लक्ष हॉस्पीटल वाडी येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. सानप ९३२५५७८१०२ यांनी आरोपी कार चालकाविरूध्द कलम १२५(अ), १२५(ब), ११५,(२) भा.न्या.सं., अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

(अकस्मात मृत्यु)

पोलीस ठाणे सक्करदरा :— दिनांक ०९.०५.२०२६ चे १३.०० वा. ते १४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, मोठा ताजबाग बुलंद गेट, लाकडी टाल जवळ एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ३१ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल आयसीयु ट्रामा सेंन्टर येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २४.०६.२०२६ चे ०८.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची अद्याप ओळख पटलेली नाही. मृतकाचे वर्णन— रंग— निमगोरा, चेहरा— लांब, उंची— ५ फुट ३ इंच, बांधा— सडपातळ, नाक— सरळ, दाढी—मिशी— हलकी वाढलेली, नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सक्करदरा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. आंधळे यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

(मिसिंग)

१) पोलीस ठाणे ईमामवाडा :— प्रशांत नत्थुजी कळंबे, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट नं. १०, चंदननगर, ईमामवाडा, नागपूर हे दिनांक २२.०६.२०२६ रोजी पासून पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ७ इंच, केस— काळे, अंगात— टि—शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

२) पोलीस ठाणे कोतवाली :— मनोज गजानन मानके, वय ३९ वर्षे, रा. श्रीराम चौक, दिपनगर, रणदिवेचे घरी नागपूर, हे दिनांक २९.०४.२०२६ रोजी पासून पोलीस ठाणे कोतवाली हद्दीतील रेशीमबाग येथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ६ इंच, केस— काळे, दाढी— फ्रेंच कट केलेली, अंगात—फुल शर्ट व जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

प्रशांत

मनोज

(ईतर)

आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

अ	कोर्टाचे नाव	केस क्र.	कलम	आरोपीचे नाव व पत्ता	पेशी तारीख
१.	मा. जिल्हा न्यायाधीश—१९ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नागपुर.	१००२९० /२००२	कलम ३०६, ३४ भा.दं.वि.	१) महेश राजाराम गोंडारे, वय ५३ वर्षे, २) राजाराम मुन्नीलाल गोंडारे वय ५६ वर्ष, दोन्ही रा. नविन नगर बाराद्वारी, कापसी नागपूर	०९.०७.२०२६

पोलीस ठाणे कोतवाली येथील बेवारस वाहना बाबत वाहन मालकांना सुचना :—

पोलीस ठाणे कोतवाली नागपुर शहर, येथे बेवारस (लावारिस विना दाव्याचे दुचाकी वाहने) दुचाकी वाहने जमा आहेत. खालील यादी प्रमाणे एकुण ६२ वाहने असुन, त्या वाहनाकरीता पो. ठाणे कोतवाली येथे कोणीही दावा केलेला नाही, या वाहनाचे मालक अद्याप मिळुन आलेले नाही. नमुद दुचाकी वाहनांबाबत पुढील कारवाई करणे असल्याने, खालील यादीतील वाहनांचे मालकांनी पोलीस ठाणे कोतवाली येथे ०७ दिवसाचे आत येवुन, आपली वाहने घेवुन जावे. अन्यथा त्यांचे काहीही म्हणने नाही, असे गृहीत धरून यातील नमुद वाहनाबाबत लिलावाची प्रक्रीया करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

वाहनाची यादी

अ. क	वाहनाचे प्रकार व वाहन क.	अ. क	वाहनाचे प्रकार व वाहन क	अ. क	वाहनाचे प्रकार व वाहन क
1	ACTIVA MH-31-W 4663	22	TVS VICTER MH-31 –BN-3929	43	BAJAJ DISCOVER MH-40 –AE-1499
2	ACTIVA MH-31-BU 6949	23	ZAYLO MH-31 –AT-0102	44	LUNA MH-31-BR-9157
3	PASSION PRO MH-31-DQ 0212	24	PULSER MH-32-G- 2154	45	SCOOTY ES MH-31-AB-1896
4	PASSION PRO NO NUMBER	25	SUNNY MH-31-7927	46	CD-100 MVF-7864
5	YAMAHA MH31-VS 1909	26	SCOOTY ES MH-31 –AQ-6510	47	SCOOTER MH-12-AA -706
6	SCOOTY PEP MH-31-CE 8446	27	CD-100 MH-31 –X-9358	48	SCOOTER MH-31-BG -320
7	SPLENDER MH-31-BW 0174	28	SCOOTER MAG-947	49	SCOOTER MH-31-AK -9685
8	PULSER MH-36-P- 151	29	SUZUKI SAMURAI MH-34-E-9444	50	LUNA MH-31-L-7141
9	AVIATAR MH-31-DQ- 5579	30	SCOOTER MTE-5395	51	ACTIVA NO NUMBER
10	PULSER MH-31-BM- 3038	31	SCOOTY MH-31-BO-3450	52	LUNA NO NUMBER
11	SCOOTY -PEP MH-31-BG -7280	32	SCOOTAR MH-31-A-6758	53	SCOOTY PEP MH-31-AU-2837
12	SCOOTY -PEP MH-31-BV -8022	33	SPLENDER MH-36-D-3374	54	LUNA NO NUMBER
13	CD 100 MH-40-AW -7230	34	KINETIC HO MH-31 –C-5174	55	LUNA NO NUMBER
14	CD 100 MFW-7879	35	LUNA MVJ--2001	56	SCOOTY PEP MH-31-CD-6615
15	SPLENDAR MH-31-BH 7328	36	SPLENDER MH-31-5603	57	SPLANDER MP-51-MB-1540
16	SPLENDER MH-31-AR 5573	37	SPLENDER MH-40-B- 6348	58	PULSER MH-31-DY-5132
17	PASSION PLUS MH-31 BL -5405	38	YAMAHA MH-31-BC-5070	59	SCOOTER MH-31-A-6639
18	SCOOTER MH-31-B- 0842	49	LUNA NO NUMBER	60	SCOOTER MH-31-N-1502
19	SPLENDAR MH-31-BM 7809	40	SPLENDER MH-31-AS-9881/8625	61	CD-100 NO NUMBER
20	PULSAR MH-36-E- 6859	41	CD-100 RED NO NUMBER	62	LUNA NO NUMBER
21	PASSION PRO MH-31 –VS-3351	42	AVENGER MH-31-EJ-0177		

स्वा/–

(अंकुश राठोड)

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.